## प्रकरण दुसरे

## देवदासी प्रथा आणि मराठी साहित्य

## प्रकरण दुसरे

## देवदासी प्रथा आणि मराठी साहित्य

देवदासी प्रथा ही आपल्या देशातील पारंपरिक पद्धतीने चालत आलेली एक जुनी धार्मिक प्रथा आहे. मात्र कोणत्याही धार्मिक ग्रंथात या प्रथेचा, परंपरेचा उल्लेख नाही. देवाच्या सेवेसाठी दासीप्रमाणे अहोरात्र कष्ट करणारी ती देवदासी. निरनिराळया ठिकाणच्या विशिष्ट पद्धतीनुसार देवदासीत काही प्रकार आढळतात. किंबहुना त्या त्यांच्यातील जातीच असतात. देवळी, मंगेशी, गणिका, मुरळी, नर्तकी, जोगतीण, बसवी, भावीण असे ते प्रकार आहेत. या सर्वच देवदासींना केवळ परिस्थितीने वारांगना जीवन जगावे लागते. धर्माच्या नावाखाली समाजाकडून त्यांचा भोग घेतला जातो. ही एक प्रकारची सामाजिक भ्रष्टताच आहे. धर्माच्या नावाखाली चाललेली अनीती फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. तीत शारीरिक संबंध म्हणजे देवासाठी केलेला व स्वार्थत्याग अशी समजूत असे. यातसुद्धा जो कोणी मागणी करील त्याच्याशी कोणत्याही प्रकारचे बंधन न ठेवता प्रेमासाठी नव्हे तर देवाची आज्ञा म्हणून तो पुढे करील त्या पैशांचा स्वीकार करून शारीरिक संबंध करण्यात येई. [1]

त्या त्या परिस्थितीत जगणा-या स्त्रिया या परिस्थितीने अगतिक, देवभोळया आणि श्रद्धाळू असतात असेच वाटते. त्यांच्या त्या श्रद्धेत भाबूकताही खूप असते. ही श्रद्धा डोळस नसते म्हणूनच अशा स्त्रिया परिस्थितीने फसत जाऊन धर्म व परंपरेत गुंतत गेल्या. प्रत्यक्ष देवाशी नसेना का पण त्याचा प्रतिनिधी म्हणून त्याच्या जवळ असणा-या एखाद्या पुजा-याशी जरी आपला शारीरिक संबंध आला तरी आपण पवित्र होऊ त्यामुळे आपणाला सद्गती मिळेल अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनात येतात. म्हणूनच धर्माच्या नावाखाली चाललेली अनीती समाजात खूप दूरवर रूजत, पसरत गेली. या संधीचा फायदा समाजातील धनिक, ढोंगी लोकांनी घेतला. देवाच्या सेवेत रत असणा-या देवदासींना त्यांनी नकळतच आपल्या सेवेत ओढायला सुरवात केली. भोगायला सुरवात केली असे समाजातील चित्र दिसते.

" हिंदुस्थानात देवदासींची पद्धत मद्रास, मुंबई व संयुक्त प्रांत, त्रावणकोर, सावंतवाडी ही संस्थाने व गोवा भागात मुख्यत: आढळते. ही चाल प्रथम कोठे सुरू झाली, केव्हा सुरू झाली, कशी सुरू झाली हिच्या मुळाशी वर निर्दिष्ट केलेल्या कारणापैकी कोणते कारण होते की याही कारणापेक्षा अगदी वेगळया कारणामुळे ती अस्तित्वात आली या संबंधी विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. आपला मुंबई

प्रांत व त्याच्या आसपासचा प्रदेश यांच्या पुरताच विचार करावयाचा झाल्यास अशी वस्तुस्थिती आहे, की धर्माच्या नावाखाली अनीतीचा धंदा करणा-या लोकांची एकच जात आहे, असे नाही तर त्यात अनेक जाती व पोटजाती असून त्यापैकी प्रत्येकीचे वेगळे नाव व वेगळा इतिहास आहे. स्थूल मानाने यांचे तीन भाग पाडता येतील 1) गाणे, नाचणे, सारंगी, तबला वाजविणे वगैरे कलेत तरबेज असलेल्या व हाच आपला मुख्य धंदा असे समजणा-या कलावंत लोकांचा पहिल्या वर्गात समावेश करता येईल. देवळात किंवा काही विशेष प्रसंगी श्रीमंत लोकांकडे गाण्या-नाचण्याकरिता जाण्याची पद्धत यांच्यात परंपरागत चालत आलेली आहे. अतिशय उत्तम गाणा-या म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुष्कळ स्त्रिया या वर्गातल्याच आहेत. या वर्गातल्या स्त्रिया अतिशय बुद्धिवान, सुस्वरूप, प्रामाणिक, कृतज्ञ, देवभोळया आणि आदरातिथ्याला अतिशय चांगल्या असतात. त्यांच्यातील काही स्त्रिया या एकाच पुरूषाशी संबंध ठेवून आपले आयुष्य नैतिकदृष्टया अतिशय चांगल्या रीतीने घालवितात. गोव्यातील देवदासींमध्ये त्यांचीच संख्या फार मोठी आहे.

2) देवळातील निरनिराळया प्रकारची खालच्या दर्जाची कामे करणा-या स्त्रियांचा दुसरा वर्ग होय. देवळातील दिवाबत्तीची साफसफाई, देवाच्या पालखीची व्यवस्था वगैरे कामे या वर्गाकडेच असतात. हे देवाचे वडिलोपार्जित सेवक असतात. हा वर्ग अशिक्षित आणि पुष्कळसा मागासलेला आहे. या लोकांची थोडी वस्ती गोव्यात आहे. पण सावंतवाडी संस्थान, विशेषतः त्यातली खेडी आणि रत्नागिरी जिल्हयातील देवगड, मालवण आणि वेंगुर्ले तालुके यांच्यात फार आहे. रत्नागिरी आणि सावंत--वाडी गॅझेटियरमध्ये यासंबंधी असे लिहिले आहे, की भाविणी आणि देवळी ही सावंतवाडी व मालवण येथील सरदारांच्या स्त्री नोकरांची संतती आहे. यांची देवाशी लग्ने लावून त्यांना जमिनी इनाम देण्यात येत.

3) तिस-या वर्गातील स्त्रिया म्हणजे खासगी कुटुंबातील घरगुती कामाकरिता पिढीजात, बंद झालेले नोकर होत. या वर्गातील लोकांचा देवळाशी फारसा संबंध नसतो. ज्या कुटुंबात ही मंडळी कामे करतात त्यांच्या पूर्वजांनी त्यांच्या चरितार्थाकरिता काही जमिनी दिलेल्या आहेत. या लोकांची वस्ती मुख्यतः सावंतवाडी शहरात आहे, गोव्यात तुरळक आहे.[2]

या समाजात जन्माला येणा-या ज्या मुली आहेत त्या मुलींचा त्यांच्या बालपणी अगदी विधिपूर्वक विवाह होतो. त्याला शेसविधी असे म्हटले जाते. या विधिनंतर त्या मुलींना देवाला सोडली, देवाला वाहिली असे म्हणतात. काही ठिकाणी देवाची बाई म्हणून तिचा उल्लेख होतो. हिचे लग्न एखादी पुरूष वेषातील स्त्री किंवा टोकाला लिंबू लावलेल्या खंजिराशी होतो. या लग्नानंतर

अशी मुलगी आपल्या आणि आपल्यावर अवलंबून असणा-या कुटुंबियांच्या पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी अनीतीलाच नीती समजून अनैतिक कार्यात गुंतते. या नंतर एखाद्या पुरूषाशी लग्न करणे किंवा स्वत:चा स्वतंत्र संसार थाटण्याचा विचारही ती करू शकत नाही. " लग्नाचा तुला हक्क नाही हवेतर एखाद्याचे अंगवस्त्र म्हणून राहूनच तुला देवाची सेवा करावी लागेल. तोच तुझा धर्म आहे." अशा प्रकारचे विचार तिच्या मनावर पूर्णपणे बिंबवले जातात आणि तिच्या लग्नावर बंदी घातली जाते. त्यामुळेच उदरनिर्वाहासाठी तिला अनीतीचा धंदा करावा लागतो. तेच त्यांचे कर्तव्य व ध्येय ठरते. अशा प्रकारच्या या धर्मभोळेपणातून रूढीच्या शृंखलेत त्यांच्या संपूर्ण आयुष्याची दिशाच बदलून गेली आहे. अनीतीने वागणे हीच नीती त्यांच्या धर्मात मान्य होते आणि ही परंपरा प्रामाणिकपणे त्या घरात तशीच पुढे चालू राहते, पसरत जाते. यात परिस्थितीत सापडून प्रामाणिकपणे शीलाचा सौदा करणा-या देवदासी भ्रष्ट की त्यांना अनीतीच्या मार्गाला लावून आपली इच्छातृप्ती करणारा समाज भ्रष्ट हा वेगळा प्रश्न आहे. मात्र देवदासींना भोगदासी बनून जीवनात होरपळावे लागते, हे सत्य आहे.

अशा या पध्दतीमुळे आर्थिक दृष्टीने घरचे सर्व व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी साहजिकच देवदासी ' स्त्री ' वर येते. त्यांच्या घरातील पुरूष हा हतबल व दुबळा ठरतो. साहजिकच त्या कुटुंबावर सर्वच बाबतीत देवदासी स्त्रीचा प्रभाव असतो. त्यातूनच तेथे मातृसत्ताक कुटुंबपद्धती आढळते. गोव्यातील देवदासी समाजातील कुटुंबात पुरूषवर्ग सुध्दा स्त्री प्रमुखाच्या मार्गदर्शनानुसार काम करी. ही बाई मोठी कर्तबगार असे. स्वत: तरूण असताना तिने नृत्यगायनादी कलांचे शिक्षण घेऊन मन:पूर्वक देवसेवा केलेली असे व हाच कुलधर्म घरातल्या मुलींनी पुढे चालवावा यावर आता तिचा कटाक्ष असे. कुलाचाराप्रमाणे मुलीचा योग्य वेळी शेसविधी करण्याची व तिला कुलशीलवान यजमान मिळवून देण्याची जबाबदारी तिच्यावरच असे. [3] याच्यातून देवदासी स्त्रिया आपली सेवा परंपरागत पद्धतीने सतत चालू ठेवत आलेल्या आहेत, असेच दिसते. मनावर कितीही तणाव आला तरी धर्मभोळेपणातून त्या लग्न आणि संसार यापासून अलिप्त राहिलेल्या आहेत, हेच दिसते. क्वचित प्रसंगी एखादी तरूणी एखाद्या तरूणाच्या प्रेमात पडून विवाहाचे ' खुळ ' डोक्यात घेऊ लागली तर तिची आई तिला त्या विचारापासून परावृत्त करते. प्रसंगी त्या विचारापासून तिला कितीही टोकाचा मार्ग अवलंबायला लागला तरी तो ती अवलंबते हे दिसते. मात्र गोमंतकीय गणिकांची यजमानाबद्दलची एकनिष्ठा, ऋजुता, रसिकता, गानकुशलता, कलाप्रियता, बुद्धिमत्ता, वागण्यातील आर्जव आणि उच्चवर्गाला शोभेल अशी राहणी या गोष्टीमुळे गोमंतकीय तरूण कलावंतीणीशी हा धनिक-वणिकवर्ग प्रेमसंबंध जोडण्यास अत्यंत उत्सुक असे. [4] याच्यातून या समाजात प्रसंगी तणाव निर्माण होतो. समाजातील उच्चवर्णीय क्वचित चांगल्या

सुशिक्षित तरूणाने देवदासी समाजातील एखाद्या तरूणीवर प्रेम केले तर समाजालाच हे प्रेम मान्य होत नाही. तो एक उघड कुचेष्टेचा विषय होतो. आपल्या देवदासी धर्माशी एकनिष्ठ, ध्येयनिष्ठ असलेली तरूणी आणि प्रतिष्ठितपणाच्या जोखडाखाली दबून गेलेला तरूण यांच्यातील प्रेम यशस्वी होऊ शकत नाही किंबहुना त्यांना ते त्यांच्या यशस्वी जीवनाचे शिखर गाठू देत नाही. धर्मश्रद्धेच्या होमात तरूण प्रेमी जीवांना आपल्या संपूर्ण आयुष्याच्याच ' समिधा ' करून समर्पित व्हावे लागते, ही खरी या जीवनातील शोकांतिका ठरते. यासारख्या विषयाला धरून देवदासी ही कादंबरीची नायिका करून बा. भ. बोरकर यांनी ' भावीण ' ( 1950 ) व जयवंत दळवी यांनी ' महानंदा ' ( 1970 ) या कादंब-या लिहिल्या आहेत. या कादंब-यांना गोमंतकीय पार्श्वभूमी लाभलेली असून त्या भाविणींच्या जीवनाशी संबंधित आहेत. तसे पाहिले तर देवदासींचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न. पण या प्रश्नात भाविणींच्या उदात्त त्यागाच्या धर्माची कथा पकडून या दोन्ही लेखकांनी श्रेष्ठ दर्जाचे कादंबरी लेखन केले आहे. मात्र मराठी साहित्यात या कादंब-या आजपर्यंत दुर्लक्षित राहिल्या आहेत. त्या कादंब-यांना न्याय मिळणे गरजेचे आहे. गोमंतकात ' भावीण ' हा देवदासींमधील प्रकार आढळतो. डॉ. ब्रगांजा परेरा यांनी " *Etnografia da India Portugesa* " या पुस्तकात शेसविधीविषयी असे म्हटले आहे, की या शेसविधीनंतर भाविणी = देवळातील दासी, कलावंतिणी = नर्तिका या वारयोषितांचे आयुष्य कंठतात. [5]

साहित्य आणि जीवन यांच्या संबंधातील अन्योन्यता हा बहुतांशी सर्वसामान्य विचार म्हणावयास हरकत नाही. ज्या समाजात साहित्यिक अथवा कलावंत राहतो त्या समाजाचे, संस्कृतीचे, त्या समाजातील विचार प्रवाहांचे आणि प्रवृत्तींचे संस्कार त्यांच्या मनावर घडत असतात. माणूस हा साहित्याचा प्रधान आणि चिरंतन असा विषय आहे. जीवनाच्या विविध प्रसंगातून आणि अनुभवातून त्याच्या अंतरंगाचे दर्शन घडविणे हे ललित वाङ्मयाचे प्रमुख ध्येय आहे. विविध व्यक्ती, त्याच्या प्रवृत्ती, त्याचे वागणे, बोलणे, जगणे, त्यांच्या विविध उक्ती आणि कृती, विकृती आणि विसंगती यामधून तो व्यक्तिमानसाची संगती लावून दाखवीत असतो. त्यामधून आपल्याला गवसलेला जीवनाचा अर्थ तो सांगतो. कोणताही कलावंत हा आपल्या युगाचा प्रतिनिधी असतो. आपल्या भोवतालच्या समाजातील विविध वर्ग, त्यातील व्यक्तींचे प्रेम, विवाह, संघर्ष यांचे चित्र त्याच्या कलाकृतीचा विषय बनणे स्वाभाविक आहे. इतकेच नव्हेतर मानवी जीवनातील सामाजिक संबंध कसे असावेत या विषयीची जाणीवही तो करून देत असतो. [6]

सामाजिक रीतिरिवाजातून निर्माण झालेला एखादा प्रश्न आणि त्या प्रश्नातून समाजात वावरत असलेले दुःख जेव्हा एखादा कादंबरीकार लिहितो तेव्हा त्या कादंबरीतून ख-या अर्थाने ' सामाजिकता 'च

अवतरते. अशा साहित्यातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत व्यक्तीच्या व समाजाच्या वास्तव जीवनाचे चित्रणच लेखकाने केलेले असते. रूढीग्रस्त समाजात अडकलेल्या उपेक्षित जीवांना एकप्रकारचा सामाजिक स्तर मिळवून देण्याचा विचार लेखकाच्या अंतर्मनात असतो त्यामुळेच तो अशाप्रकारच्या एखाद्या सामाजिक प्रश्नावर लक्ष केंद्रित करून साहित्यकृती निर्माण करतो. त्यामुळे वाचकामार्फत त्या समाजाची जागृती होत असते. उद्‌बोधन प्रबोधन होत असते. साहजिकच क्वचित प्रसंगी समाजात नवा बदल घडवून आणण्याची प्रक्रियाही सुरू होते.

जिवाच्या आकांताने जीवनाशी संघर्ष करीत झगडत मनस्वीपणाने जगणारी अनेक माणसे समाजाच्या वेगवेगळया थरात आहेत. गावकुसाबाहेर अस्पृश्यतेच्या वणव्यात होरपळून गेलेले दलित, दिशाहीन जीवन जगणारे भटके, शहरी संस्कारापासून कित्येक वर्षे अलिप्त असणारे आदिवासी, श्रमजीवी कामगार, शेतमजूर, शहरी औद्योगिकरणातून अपरिहार्यपणे निर्माण झालेल्या झोपडपट्टया आणि त्यात किडामुंगीसारखी वळवळत जगणारी माणसे, केवळ अपरिहार्यपणे शारीरिक पीडा नशिबी आल्यामुळे अगतिकपणे आयुष्य कंठत उपेक्षित जीवन जगणारे अपंग, कुष्ठरोगी आणि समाजात धर्माच्या नावाखाली चाललेल्या अनीतीच्या विळख्यात सापडलेल्या ' देवदासी ' या सारखे विषय मराठी कादंबरीत अनेक लेखकांनी हाताळायला सुरवात केली आणि मराठी कादंबरीलाच एक उज्ज्वल अशी दिशा सापडली. वास्तव जीवनानुभवामुळे या अशा प्रकारच्या साहित्याला जनमानसात एक प्रकारचे निश्चित स्थान मिळाले.

मानवी समूहाच्या जीवनानुभवाशी निगडित असणारे साहित्य हे वास्तव पातळीवरून उतरत असते. माणूस आणि त्याच्या अवतीभवतीचा समाज यांच्यातील व्यावहारिक सत्य लेखकाच्या अनुभूतीतून अभिव्यक्त होत उलगडत जाते. माणूस जगत असताना ज्या ज्या सामाजिक नीतिनियमाशी बांधील राहून आपले जीवन अनुभवत असतो ते ते नीतिनियम अनेकवेळा माणसाचा सामाजिक जीवनस्तर दाखविणारे ठरतात. उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य अशा प्रकारच्या अनेक सामाजिक जीवनस्तरातून माणूस जगत असतो. त्याच्यातूनच त्याचे जीवन सुसह्य आणि असह्य बनत जाते. अशा असह्य जीवनस्तरात जगणा-या समाजातील अनेक उपेक्षित मानवी समूहाचे जीवन चित्रण मराठी साहित्यात अतिशय संवेदन क्षमतेने निर्माण झालेले आहे. ते ते अनेक पातळीवरच्या जीवन जाणिवेतूनच अभिव्यक्त झालेले आहे. अगदी मराठी कादंबरीची सुरूवात आपण पाहिली तर बाबा पद्‌मनजींच्या यमुना पर्यटन पासून, ह.ना. आपटे- पण लक्षात कोण घेतो, वा.म. जोशी - आश्रम हरिणी, श्री.व्यं. केतकरांची

ब्राहमणकन्या यांसारख्या कादंब-यांचा फक्त प्रातिनिधिक कादंब-या म्हणून विचार करता येईल. या सर्व साहित्यिकांच्या कादंब-यांतून त्यांच्या काळातील एकूण समाज स्थितीचे आणि मानवी जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण वास्तव पातळीवरच उतरले आहे. समाजहिताच्या दृष्टीने त्या त्या साहित्यातून मौलिक अशाप्रकारचे दिग्दर्शन घडले आहे. नव्या बदलासाठी, चांगल्या परिवर्तनासाठी कळत-नकळत काहीसे सूचनच या साहित्यातून प्रकट झाले आहे हे नाकारता येण्यासारखे नाही. म्हणूनच साहित्यातून जाणवणारे सामाजिक वास्तव ही काही नवी बाब नाही. म्हणजे समाजाचे प्रतिबिंबच आजवरच्या साहित्यातून पडत आले आहे हे एक उघड सत्य आहे. हे सत्य कालपासून आजपर्यंतच्या साहित्यातूनही प्रत्ययकारी होऊन उतरत आहे हे महत्वाचे आहे.

कोणताही लेखक साहित्य निर्मिती करीत असताना आपल्या भावजीवनाशी बांधील राहतो. त्याचे स्वतःचे जीवनानुभव आणि चिंतन हे साहित्यातून व्यक्त होते आणि म्हणूनच साहित्य समाजाला काही नवा विचार देणारे ठरते. लेखकाचा अर्थपूर्ण जीवनानुभव आणि अंतर्मुख होऊन झालेले चिंतन साहित्यातून अभिव्यक्त झालेतर प्रत्ययकारी साहित्य निर्माण होते. हे खरे पण यातील लक्षणीय मुद्दा असा लेखक चिंतन करीत असताना केवळ समाज जीवन आणि सामाजिक समस्या यांच्या दरम्यानच आपले विचार व्यक्त करून थांबत नाही तर सामाजिक समस्या, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, त्या प्रश्नांचा एकमेकाशी असणारा गूढ अनुबंध आणि त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नेमके अपेक्षित उत्तर सापडावे म्हणूनच तो चिंतन करतो. आपल्या साहित्य कृतीतून एखाद्या प्रश्नाबरोबरच त्याचे उत्तरही तो दाखवून देतो हे उघड आहे.

लेखक साहित्य निर्मिती करतो म्हणजेच साहित्यातून तो स्वतःच एखादी प्रतिसृष्टी निर्माण करतो. या प्रतिसृष्टीतूनच तो आपली अनुभूती अभिव्यक्त करण्याचा स्वतःच्या ताकदीप्रमाणे प्रयत्न करतो आणि त्याच्यातूनच सामाजिक समस्यांना दिशा दाखवितो. याच्यातून समाजाला एक प्रकारचे सूचन मिळते. कारण साहित्याचा उलटा प्रभाव समाजावर पडतो. सर्व साधारण वाचक हा साहित्य वाचत असताना वैचारिक प्रेरणेने ते वाचत नाही तर स्वतःची करमणूक व्हावी, रंजन व्हावे हाच त्याचा प्रधान उद्देश असतो. पण वाचता वाचता तो विषयात शिरत जातो. एखाद्या सामाजिक आशयाशी निगडित असणा-या कथानकात तो रंगतो आणि त्यातूनच त्याला रंजनाबरोबर एक प्रकारची दिशा सापडत

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जाते. एखाद्या सामाजिक समस्येतून निर्माण होणारे दुःख, त्या दुःखाशी झगडत जगणारा एखादा समूह, त्यांची असहाय अगतिकता आणि अशा परिस्थितीला कारणीभूत ठरणारी एखादी पूर्वापार चालत आलेली परंपरा, रूढी, अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा याचा वाचकाला उलगडा होत जातो. त्याचा तो वेध घेतो. सामाजिक परिवर्तनाचा विचार नकळतच त्याच्या मनामध्ये येतो. हा साहित्याचा सामाजिकतेच्या पातळीवर वाचकावर परिणाम घडतो. साहित्याचे नेमके प्रयोजन काय किंवा त्याच्या उद्देशाच्या कारण मीमांसेपक्षा चिंतन आणि जीवनानुभवातून निर्माण झालेल्या साहित्याचा परिस्थिती सापेक्ष वाचकाच्या मनावर होणारा परिणाम महत्वाचा ठरतो. कारण तो एखाद्या प्रश्नाच्या चिरंतन बदलाशी निगडितही असू शकतो हे येथे विचारात घेण्यासारखे आहे. ते पटवून देण्यासाठी आज मराठी कादंब-यांच्या इतिहासात शिरण्याची फार मोठी आवश्यकता नाही. कारण हे एक वाड्.मयीन सत्य आहे, ते स्पष्टच दिसते.

सामाजिक जीवन जाणिवेतून आजपर्यंत निर्माण झालेले जे जे साहित्य आहे ते ते अशाच प्रकारचे आहे. आज आपण प्रत्यक्षात पाहतो की देवदासींचा समाज हा आज उपेक्षितपणाचा भाग ठरला आहे. परंपरा, अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा या चौकटीच्या आतच चाचपडत असलेला, पाप-पुण्य, नीति-अनीतीच्या चक्रात फिरणारा हा समाज परंपरेच्या दलदलीत रुतलेला आहे. फसलेला आहे. या समाजातील स्त्रियांचे दुःख अतिशय दारूण आहे. त्यांची व्यथा समजणा-या कोणत्याही सहृदय माणसाच्या मनात त्यांच्या विषयी करूणा निर्माण व्हावी इतके कारूण्य त्यांच्या जीवनात आढळते. कारण समाजातील स्वार्थी आणि भोगलालसी प्रवृत्तीनेच त्यांच्या जीवनाची दुर्दशा केलेली आहे. सबंध देशभर वेगवेगळया प्रकारात आढळणा-या आणि वेगवेगळया नावांनी ओळखल्या जाणा-या या उपेक्षित देवदासींचे जीवन चित्रण मराठीत अनेक मान्यवर लेखकांनी केलेले आढळते. ना.सी. फडके, बा.भ. बोरकर, श्री.व्यं. केतकर, अण्णाभाऊ साठे, जयवंत दळवी, सुभाष भेंडे, मधु मंगेश कर्णिक, उत्तम तुपे, राजन गवस यांसारख्या जुन्या - नव्या, सक्षम आणि आश्वासक साहित्यिकांनी हा विषय उचलून धरला आहे. देवदासी जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारे श्रेष्ठ आणि सामाजिक मूल्य लाभणारे गंभीर प्रकृतीचे साहित्य या सर्वच साहित्यिकांनी स्वतःच्या जीवनानुभवातून आणि चिंतनातून निर्माण केले आहे. म्हणजे समाजात उपेक्षित ठरल्या गेलेल्या, पारंपारिक जीवन जगत असहाय आणि अगतिक बनलेल्या या स्त्रियांचे समाजातील स्थान निश्चित करून त्यांना माणूस म्हणून ख-या अर्थाने जगता यावे म्हणून योग्य जीवनस्तर

मिळवून देण्यासाठी योग्य प्रश्नाच्या दिशेने या साहित्याची निर्मिती झाली आहे हे निश्चित. देवदासींची एक सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सामाजिक प्रतिक्रिया निर्माण होण्यासाठी हे साहित्य उपयोगी ठरले आहे.

वरील पार्श्वभूमीवर ' भावीण ' या देवदासींच्या एका समूहातील स्त्रियांचे जीवनदर्शन बा.भ. बोरकर यांच्या ' भावीण ' व जयवंत दळवी यांच्या ' महानंदा ' या दोन्हीही कादंब-यांतून प्रत्ययकारीपणे झालेले आढळून येते. या दोन्ही कादंब-या श्रेष्ठ सामाजिक व साहित्यिक मूल्य लाभलेल्या असूनही मराठी साहित्यात त्यांची दखल अभावानेच घेतलेली आढळते.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मराठी साहित्यातील देवदासी प्रथेबद्दल केल्या गेलेल्या लिखाणात आपल्या सामाजिक मूल्यवत्तेने व वाङ्.मयीन गुणवत्तेने मोलाची भर घालणा-या या कादंब-यांचा सामाजिक व वाङ्.मयीन अभ्यास उपरोक्त उणीव भरून काढणारा आणि म्हणूनच उचित व मोलाचा ठरेल असा विश्वास वाटतो.

## × संदर्भ व टीप ×


1) नाईक, पुरूषोत्तम गोविंद ' देवदासी ', पुरोगामी सत्यशोधक, (जाने - मार्च - 1980) पृ. 13.

( देवदासी प्रथेची पार्श्वभूमी समजण्यासाठी पु.गो. नाईक यांनी लिहिलेल्या ' वेश्या व वेश्या व्यवसाय ' प्रकाशक समाज सेवा संघ, मुंबई, पहिली आवृत्ती - 1924 या पुस्तकातील पहिल्या प्रकरणातून. )

2) तत्रैव पृष्ठे. 16 व 17.

3) सातोस्कर, बा.द. ' देवदासी प्रथेचा इतिहास ', पुरोगामी सत्यशोधक, (जाने, मार्च - 1980), पृ.39.

4) तत्रैव पृ. 41.

5) नाईक पुरूषोत्तम - गोविंद ' देवदासी ', पुरोगामी सत्यशोधक (जाने., मार्च - 1980), पृ. 27.

6) नसिराबादकर. ल. रा. ' मराठी कादंबरी आणि उपेक्षितांचे जीवन चित्रण ', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, (जाने, जून - 1978), पृ. 93.